# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८,
## वैद्यकीय विभाग
## धन्वंतरी स्वास्थ्य योजना समिती सभेचा सभावृत्तांत

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीचे सदस्यांची विविध विषयांवर चर्चा करणेकामी त्रैमासिक आढावा बैठक दि.१०/११/२०१६ रोजी दु.१२.३० वाजता आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीकरिता खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री. दिनेश वाघमारे. आयुक्त तथा अध्यक्ष
२. श्री. बबनराव झिंझुर्डे, अध्यक्ष. कर्मचारी महासंघ, तथा उपाध्यक्ष
३. डॉ. के अनिल रॉय, आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा कार्याध्यक्ष
४. श्री. राजेश लांडे. मुख्यलेखापाल तथा सदस्य
५. श्रीमती पद्मश्री तळदेकर. मुख्यलेखापरिक्षक तथा सदस्य
६. डॉ. महेशकुमार डोईफोडे. सहा.आयुक्त तथा सदस्य
७. डॉ. मनोज देशमुख. वैद्यकीय अधिक्षक तथा सदस्य
८. ॲड. सर्जेराव लावंड, कायदा अधिकारी (कायदा सल्लागार यांचे प्रतिनिधी)

सदर बैठकीमध्ये विषयपत्रिकेत नमूद करण्यात आलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने चर्चा करण्यात आलेली असून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. सदर बैठकीस डॉ.पवन साळवे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असून त्यांनी परस्पर रजेचा अर्ज सादर केलेला आहे. सदर बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक असतांनादेखील डॉ.साळवे यांनी कोणतीही पूर्वकल्पना न देता रजेवर गेल्यामुळे त्यांची रजा नामंजूर करण्यात यावी तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाही ठेवण्यात यावी असे मा.आयुक्त सो. यांनी निर्देश दिलेले आहेत.

२. धन्वंतरी योजनेच्या दरपत्रकामध्ये समाविष्ट नसलेल्या उपचारपध्दती / शस्त्रक्रियांकरिता वेळोवेळी रुग्णालयांकडून प्राप्त झालेल्या कोटेशननुसार / बिलांनुसार दरांची निश्चिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. यास्तव केईएम रुग्णालय, आदित्य बिर्ला रुग्णालय, लोकमान्य रुग्णालय व दिनानाथ मंगेशकर रुग्णालय अशा नामांकित रुग्णालयांकडून प्रथम दरपत्रक मागविण्यात येवून त्यामधील लघुत्तम दर ग्राह्य धरुन त्यांस धन्वंतरी योजनेमध्ये उपचारार्थ मान्यता देण्यात आलेली आहे असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी नमूद केले. तथापि मागील बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सूचनेनुसार सदरचे दर हे धन्वंतरी समितीचे मान्यतेकामी सादर करण्यात आले असल्याचे सांगितले.

मा.आयुक्त सो. यांनी धन्वंतरी समिती ही प्रशासकीय समिती असल्यामुळे स्टेंट. इम्प्लांट्स इ. चे दराबाबत समितीमार्फत मान्यता देणे संयुक्तिक ठरणार नाही. यास्तव वैद्यकीय अधिका-यांचे पॅनल नियुक्त करुन सदरचे दर योग्य असल्याबाबत पॅनलने प्रमाणित

केल्यानंतर ते ग्राह्य धरण्यात यावेत व त्यानंतर सदरचे दर धन्वंतरी समितीपुढे स्विकृतीकामी सादर करण्यात यावेत.

मुख्यलेखापरिक्षक यांचेमार्फत अशा परिस्थितीत नामांकित खाजगी रुग्णालयांकडून दर स्टेंट. इम्प्लांट्स इ. चे मागवून तुलनात्मक लघुतम दर स्विकृत करण्यात यावे असे सुचविण्यात आले.

मुख्यलेखापाल श्री.लांडे यांनी सदरचे दर हे धन्वंतरी धोरणामध्ये समाविष्ट नसल्याने त्याकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी सूचित केले. तथापि. धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ यामध्ये नव्याने प्राप्त होणा-या प्रक्रिया / शस्त्रक्रियांकरिता आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत दर निश्चित करणेस मान्यता देण्यात आलेली असल्याने त्याकरिता मा.महापालिका सभेपुढे जाण्याची आवश्यकता नसल्याचे श्री.झिंझुर्डे यांनी नमूद केले.

सबब, सदरच्या विषयपत्रामध्ये सादर करण्यात आलेल्या दरांना मान्यता देण्यात येत असून यापुढे धन्वंतरी योजनेच्या दरपत्रकामध्ये समाविष्ट नसलेल्या उपचारपध्दती / शस्त्रक्रियांकरिता वेळोवेळी रुग्णालयांकडून प्राप्त झालेल्या कोटेशननुसार / बिलांनुसार स्टेंट, इम्प्लांट्स इ.चे दरांची निश्चितीकामी आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक (वाय.सी.एम. रुग्णालय) व वैद्यकीय अधिकारी (धन्वंतरी कक्ष) यांची तांत्रिक समिती नियुक्त करुन या त्रिसदस्यीस तांत्रिक समितीमार्फत सदरचे दर प्रमाणिक करुन ते समितीपुढे मान्यतेकामी सादर करण्यात यावेत.

३. डे-केअर स्वरुपात पुरविण्यात येणा-या डायलिसीस, मोतीबिंदू, बायप्सी, कॅन्सरवरील उपचार, ई.एन.टी. विविध प्रकारच्या स्कोपी इ. शस्त्रक्रिया / उपचारांकरिता धन्वंतरी योजनेच्या सभासदांना धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत मोफत उपचार उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. धन्वंतरी योजनेंअतर्गत सभासद असलेली व्यक्ती कोणत्याही आजाराचे उपचाराकरिता वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये दाखल झालेली असेल व अशा रुग्णांस तपासण्या करण्यास सूचित करण्यात आलेले असेल व अशा तपासण्या वाय.सी.एम. रुग्णालयाकडे उपलब्ध नसतील, त्यावेळी वाय.सी.एम. रुग्णालयातील रुबी ऐलकेअर संचलित एम.आर.आय., सीटी स्कॅन व लॅबमध्ये करण्यात येणा-या विविध चाचण्यांकरिता बिलांची अदायगी योजनेअंतर्गत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. अशा करण्यात आलेल्या तपासण्यांपोटी मे.रुबी ऐलकेअर यांना बिलांची अदायगी धन्वंतरी योजनेतून करण्यात यावी. तथापि, बाह्यरुग्ण विभागात (OPD) सूचित करण्यात आलेल्या तपासण्यांकरिता कोणतीही बिले योजनेअंतर्गत अदा करण्यात येऊ नयेत.

५. लेखापरिक्षण विभागामार्फत मार्च २०१६ पर्यंत धन्वंतरी योजनेअंतर्गत रुग्णालयांकडून प्राप्त झालेल्या बिलांचे लेखापरिक्षण करण्यात आलेले असून त्यामध्ये आढळून आलेल्या आक्षेपांबाबत धन्वंतरी कक्षाकडे लेखी स्वरुपात कळविण्यात आलेले असल्याचे

मुख्यलेखापरिक्षक यांनी नमूद केले. तथापि. त्यामधील काही बाबींची पूर्तता धन्वंतरी कक्षामार्फत करण्यात आलेली असून उर्वरित काही बाबींनुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत मनपा सेवेतील व सेवानिवृत्त असे एकूण ८२९५ सभासदांची नोंदणी झालेली असून त्यांचेकडून प्रत्येकी र.रु.३००/- व महापालिका हिस्सा प्रत्येकी र.रु.६००/- अशी रक्कम दरमहा धन्वंतरी योजनेच्या लेखाशिर्षावर जमा करण्यात येते. त्यानुसार वर्षाकाठी र.रु.८.५ कोटी इतकी रक्कम उपलब्ध होते. तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचा हिस्सा र.रु.१५०/- व मनपा हिस्सा र.रु.३००/- यातून र.रु.३७.९१ लाख इतकी रक्कम धन्वंतरी योजनेच्या लेखाशिर्षावर जमा होत आहे. परंतु धन्वंतरी योजना कार्यान्वित झाल्यापासून दरमहा साधारणपणे २ ते २.५ कोटी रकमेची बिले प्राप्त होत आहेत. म्हणजेच वर्षाकाठी २६ ते ३० कोटींचा खर्च सभासदांचे उपचारावर होणार आहे. त्यामुळे सदर खर्चावर नियंत्रण ठेवणेकरिता आवश्यक त्या उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मुख्यलेखापरिक्षक यांनी नमूद केले.

श्री.लांडे यांनी याकामी धन्वंतरी कक्षामार्फत महानगरपालिकेमार्फत योजनेच्या अतिरिक्त झालेल्या खर्चाकरिता अनुदान उपलब्ध करुन देणेस कळविण्यात आल्याचे नमूद केले. तथापि. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे अंमलबजावणीकरिता शासनाची मान्यता घेण्यात यावी असे सूचित केले व याकामी तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा अशी मागणी केली.

श्री.झिंझुर्डे यांनी धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण हे महानगरपालिकेने कर्मचा-यांसाठी राबविण्यात येत असलेली योजना असून त्यांस मा.महापालिका सभेची मान्यता घेण्यात आली असल्याचे नमूद केले. तथापि. श्री.लांडे यांनी मा.महापालिका सभेच्या मान्यतेनंतर देखील शासनाकडे धोरण मान्यतेकामी पाठविण्याचा पुनरुच्चार केला.

मुख्यलेखापरिक्षक यांनी यापूर्वी महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेली वैद्यकीय बिले प्रतिपूर्ती व समायोजनाचे योजनेनुसार दरवर्षी अंदाजे र.रु. ६ ते ७ कोटी इतकी रक्कम खर्ची पडत असल्याचे नमूद केले. तथापि. श्री.झिंझुर्डे यांनी यापूर्वीच्या योजनेमध्ये सर्व कर्मचा-यांची बिले मंजूर करण्यात येत नव्हती व मंजूर करण्यात आलेल्या बिलांमध्ये महानगरपालिका ८० टक्के इतकी रक्कम मंजूर करित होती. परंतु प्रस्तुतच्या योजनेमध्ये कर्मचा-यांना १०० टक्के मोफत उपचार उपलब्ध आहेत व उपचार घेतलेल्या सभासदांची संख्यादेखील गेल्या वर्षाचे तुलनेने अधिक झालेली आहे. त्यामुळे योजनेच्या खर्चात वाढ झालेली आहे.

पूर्वीची वैद्यकीय बिलांचे प्रतिपूर्ती योजना बंद करुन धन्वंतरी स्वास्थ्य योजना राबविण्यात येत आहे. त्यामागे सदरची योजना ही स्वशाश्वत (Self Sustained) असल्याचा उद्देश होता. परंतु योजनेअंतर्गत होणारा खर्च लक्षात घेता याप्रमाणेच सदरची योजना चालू राहिली तर खर्चावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. त्याकरिता नियोजनबध्द उपाययोजना करणे आवश्यक आहे असे श्रीमती तळदेकर यांनी नमूद केले. चालू आर्थिक वर्षात योजनेवर झालेला खर्च हा एकूण गोळा झालेल्या वर्गणीच्या ३ पट अधिक आहे.

श्री. झिंझुर्डे, उपाध्यक्ष, धन्वंतरी समिती यांनी यापूर्वीची योजना व धन्वंतरी स्वास्थ्य योजना यामध्ये खूप फरक असून धन्वंतरी योजनेमध्ये कर्मचा-यांमार्फत स्वहिस्सा भरण्यात येत असल्याचे नमूद केले. पूर्वीच्या योजनेमध्ये कर्मचा-यांचा हिस्सा घेण्यात येत नव्हता तसेच सर्व कर्मचा-यांना त्यामध्ये मोफत उपचाराची मुभा नव्हती.

यावर मा.आयुक्त सो. यांनी विमा कंपनीमार्फत पूर्णपणे कोणत्याही आजाराकरिता खर्च मंजूर करण्यात येत नसल्याचे नमूद करून विमा कंपनीचे आरोग्य विमा योजनेच्या धर्तीवर धन्वंतरी योजना राबविता येईल काय याबाबत चाचपणी करण्याची सूचना केली.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी नगरसेवकांकरिता महानगरपालिकेमार्फत उतरविण्यात आलेल्या विमा योजनेचा दाखला देवून १२८ नगरसेवक व त्यांचे कुटुंब यांचेकरिता ५ लाखांचा विमा उतरविण्यात आलेला असून त्याकरिता प्रत्येकी र.रु.१५,६००/- इतकी रक्कम हप्त्यापोटी भरण्यात आल्याचे नमूद केले. त्यास मुख्यलेखापरिक्षक यांनी विमा हप्त्याची रक्कम ही सदस्याचे वय व वैद्यकीय पूर्वइतिहास विचारात घेवून ठरविण्यात येते अशी पुष्टी दिली. तसेच त्याकरिता Buffer Stock हा देखील पर्याय विमा योजनेमध्ये उपलब्ध आहे. त्यानंतर श्री.लांडे यांनी महाराष्ट्र शासनामार्फत अशा प्रकारे विमा कंपनीद्वारे राज्य शासनाचे कर्मचा-यांकरिता आरोग्य विमा उतरविण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मागील धन्वंतरी समितीचे बैठकीमध्ये झालेल्या Cross Subsidy बाबतचा मुद्दा बैठकीमध्ये उपस्थित केला असता श्री.लांडे यांनी शासनाकडे धोरण मान्यतेकामी सादर करणेबाबत प्रस्ताव सादर करण्याची मा.आयुक्त सो. यांचेकडे विनंती केली तसेच त्याबरोबर तरतूद वर्गीकरणाबाबत कार्यवाही करण्यात येईल असे कळविलेले आहे.

मा.आयुक्त सो.यांनी किरकोळ आजार उदा.व्हायरल फिव्हर ची बिले किती रकमेची असतात अशी विचारणा केली. त्यावर अशा प्रकारी बिले हे र.रु.१०,०००/- ते ५०,०००/- पर्यंत असल्याचे कळविले असता मा.आयुक्त सो. यांनी याबाबत विचार करणेकामी सूचना दिली. तसेच याबाबत कोणताही कर्मचारी गैरफायदा तर घेत नाही याबाबत चौकशी करावी असे सांगितले. यावर उपाध्यक्ष श्री.झिंझुर्डे यांनी जे कर्मचारी चुकीच्या कारणास्तव विनाकारण रुग्णालयात दाखल होतात त्यांचेवर तसेच अशा प्रकारे रुग्णांना दाखल करून घेणा-या रुग्णालयांवर प्रशासकीय कारवाई करण्यास महासंघाचा विरोध नसल्याबाबत मत मांडले. तथापि, आरोग यवैद्यकीय अधिकारी यांनी आजाराबाबत किरकोळ किंवा गंभीर असे वर्गीकरण करता येणे शक्य नाही असे नमूद केले.

श्री.लांडे यांनी धन्वंतरी स्वास्थ्य योजनेच्या पार्श्वभूमीवर विमा कंपनीकडून Customized Scheme तयार करून घेणेबाबत विचार करणेत यावा असे सुचविले. तसेच रुग्णालयांचे गुणवत्तेनुसार विमा कंपनी त्यांना उपचाराकरिता बिल अदा करतात. त्यामुळे कोणतीही अशी विमा कंपनी जी धन्वंतरी योजनेप्रमाणे फायदे कर्मचा-यांना उपलब्ध करून देईल अशा कंपनीकडून महानगरपालिकेस आरोग्य विमा उतरविता येईल. त्यामध्ये महानगरपालिकेस फक्त विमा हप्त्याची रक्कम भरावी लागेल व त्याकरित अन्य कोणतीही वेगळी यंत्रणा राबविण्याची आवश्यकता राहणार नाही.

मुख्यलेखापरिक्षक यांनी याकरिता विमा कंपन्यांकडून दर मागविणे संयुक्तिक राहील व त्यानुसार प्राप्त होणा-या तुलनात्मक हप्त्याचे रकमेमधून महानगरपालिकेस विमा हप्त्याची रक्कम अदा करणे योग्य राहील असे नमूद केलेले आहे.

मा.आयुक्त सो. यांनी धन्वंतरी योजनेमध्ये अनावश्यक असलेले किरकोळ स्वरुपाचे आजारांकरिता देखील कर्मचारी रुग्णालयात दाखल होत असल्यामुळे व रुग्णालयांमार्फत देखील अनावश्यक असलेल्या सभासदांना रुग्णालयात दाखल करुन घेण्यात येत असल्यामुळे योजनेच्या अंतर्गत उपचार घेण्या-यांची संख्या अधिक झाल्याचे दिसून येत असल्याबाबत नमूद केले. तसेच सदरची सुविधा ही पूर्णपणे कॅशलेस असल्यानेदेखील त्यामध्ये सभासदांमार्फत किरकोळ कारणास्तव रुग्णालयांना दाखल करुन घेण्याबाबत आग्रह धरण्यात येतो.

अशा प्रकारे योजनेमध्ये उपचार पुरविण्यात आल्यास धन्वंतरी योजनेचा खर्च हा महानगरपालिकेस सोसणार नसल्याचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी नमूद केले. तसेच अद्यापपर्यंत रुग्णालयांकडून प्राप्त झालेली बिले अदायगीची कार्यवाही प्रलंबित असून सभासदांनी रुग्णालयात अगोदरच उपचार घेतलेली असल्यामुळे ती बिले अदा करणे आवश्यक आहेत.

धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना रुग्णालयांमार्फत उपचार पुरविण्यात आलेले आहेत. त्यामुळे अशा उपचारांकरिता रुग्णालयांची बिले अदा करावी लागणार आहेत. यास्तव लेखा विभागामार्फत धन्वंतरी योजनेचे लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करण्याची कार्यवाही करावी तसेच धन्वंतरी कक्षामार्फत तातडीने धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण राज्य शासनाकडे मान्यतेकामी पाठविणेबाबतचा प्रस्ताव सादर करावा असे मा.आयुक्त यांनी आदेश दिलेले आहेत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी त्यांचे अभिप्रायामध्ये नमूद केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर मुळ वेतन व ग्रेड पे ला आधारभूत धरुन कर्मचा-यांचा हिस्सा योजनेमध्ये घेण्यात अशी मागणी केली. तसेच सेवेत असलेल्या कर्मचा-यांप्रमाणेच धन्वंतरी योजनेमध्ये उपचार सेवानिवृत्त कर्मचा-यांना देण्यात येत असल्याने सेवानिवृत्त कर्मचा-यांचे देखील निवृत्तीवेतनाप्रमाणे सभासद वर्गणी आकारण्यात यावी अशी सूचना केली. परंतु श्री. झिंझुर्डे यांनी पुणे महानगरपालिकेमार्फत कर्मचा-यांचे हिश्शायाव्यतिरिक्त होणारी संपूर्ण रक्कम ही महानगरपालिका अदा करित असल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच निवृत्तीवेतन धारक कर्मचा-यांना सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या तुलनेत ५० टक्के कमी वेतन मिळत असल्याने त्यांना कमी रक्कम वर्गणी म्हणून आकारण्यात येत असलेबाबत नमूद केले. तथापि, पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर योजना राबविण्यास अथवा पूर्वीची समायोजनाची योजना पुनःश्च कार्यान्वित करण्यासही हरकत नसल्याचे उपाध्यक्ष, धन्वंतरी योजना यांनी स्पष्ट केले.

मा.आयुक्त सो. यांनी धन्वंतरी योजना ही स्वशाश्वत योजना म्हणून राबविण्याचे धोरण असल्यामुळे त्याकरिता होणारा खर्च हा त्यामधून होणा-या वर्गणीमध्येच भागविणे आवश्यक असलयाचे नमूद केले.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांकडून वर्गणीपोटी रु.रु. २५ लाख इतकी रक्कम जमा होऊन त्यांचेवर झालेला खर्च हा अंदाजे २ कोटी इतका आहे. म्हणजेच जमा झालेल्या वर्गणीच्या १० पटीने त्यावर खर्च झालेला आहे. यावर मा.आयुक्त सो. यांनी सदरची

योजना ही महानगरपालिकेमार्फत राबविण्याऐवजी ती त्रयस्थ संस्थेकडे चालविण्यास देण्यात यावी अशी सूचना केली. तसेच याकामी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत विमा कंपनीच्या प्रतिनिधींची चर्चा करुन धन्वंतरी योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व उपचारांचा समावेश करुन विमा उतरविण्याबाबत कार्यवाही करावी असे आदेश दिले.

तसेच मा.महापालिका सभेपुढे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १(के) नुसार तरतूद वर्ग करण्याची कार्यवाही ठेवण्याबाबतही आदेश दिले.

६. धन्वंतरी योजनेमध्ये सभासद असलेल्या स्त्री अथवा पुरुष कर्मचा-यांचे पती / पत्नी राज्य शासनाकडे सेवेत कार्यरत असल्यास त्यांना राज्य शासनामार्फत वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती करण्याचे धोरण लागू आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत अशा कर्मचा-यांचे पती / पत्नीस धन्वंतरी योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच ज्या कर्मचा-यांना अशा प्रकारे योजनेचा लाभ देण्यात आला असेल त्यांचेकडून इतर कोणत्याही विभागाकडून बिले अदायगीची मागणी करण्यात आली नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

७. महानगरपालिकेच्या सेवेमध्ये परिविक्षाधीन कालावधीत असलेल्या तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचा-यांना वेळोवेळी योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले असून त्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. तथापि, अशा अधिकारी / कर्मचा-यांना योजनेमध्ये समाविष्ट केलेबाबत मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे असे मुख्यलेखापरिक्षक यांनी नमूद केले. तथापि, धन्वंतरी योजना धोरणामध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना नव्याने सेवेत येणा-या कर्मचा-यांना सभासदत्व देण्याचा अधिकार असल्यामुळे याकरिता मा.महापालिका सभेकडे मान्यतेकामी जाण्याची आवश्यकता नाही.

८. श्री.नंदकुमार चौधरी, नळ मुकादम यांनी दि.३१/०५/२०१६ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर योजनेचे सेवानिवृत्त सभासद होणेकामी दि.५/०७/२०१६ रोजी अर्ज सादर केलेला होता. तथापि, त्यानंतर श्री.चौधरी हे दि.२७/०७/२०१६ रोजी निरामय रुग्णालय येथे तातडीचे उपचाराकरिता दाखल झालेले असून त्याबाबत त्यांचे मुलाने धन्वंतरी कक्षाकडे लेखी पत्रान्वये कळविलेले होते. त्यामुळे श्री.चौधरी यांचे बिलाची प्रतिपूर्ती करुन देण्यात यावी.

९. श्री.सिद्रामे काळे, विजतंत्री हे दि.३०/११/२०१५ रोजी सेवानिवृत्त झालेले असून त्याच दिवशी एम्स हॉस्पीटल, औंध येथे उपचारार्थ दाखल झालेले आहेत. तथापि, ज्या दिवशी श्री.काळे रुग्णालयात दाखल झाले त्यादिवशी ते योजनेचे सभासद असल्यामुळे त्यांना योजनेअंतर्गत लागू असलेले सर्व लाभ देय आहेत.

१०. श्री.महेश वसंत बेंडे, कनिष्ठ अभियंता यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना कोथरुड येथील कृष्णा हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आलेले होते. तथापि, तेथून त्यांना पॅनलवर नसलेल्या जोशी हॉस्पीटल येथे उपचारार्थ दाखल करण्यात आलेले होते. परंतु जोशी हॉस्पीटल येथे जातांना पॅनलवरील २-३ हॉस्पीटल सोडून तेथे दाखल करण्याऐवजी श्री.बेंडे यांना जोशी

हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आलेले होते. सबब, श्री. वेंडे यांचे बिलाचे अदायगी करता येणार नाही.

११. श्रीमती संजीवनी मोरे, अनुरेखक यांचे पती शासकीय सेवेत नोकरीस असून त्यांचे नाव योजनेमध्ये समाविष्ट नव्हते. तथापि, त्यांना दि.१२/०८/२०१६ रोजी रुग्णालयात दाखल केल्यानंतर १ महिन्यानंतर म्हणजेच दि. १२/०९/२०१६ रोजी त्यांचे नाव योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यामुळे श्रीमती मोरे यांचे पतीवर केलेल्या उपचाराची बिले अदा करता येणार नाही.

१२. श्री.चंदिरामाणी, मुख्य लिपीक यांना आदित्य बिर्ला रुग्णालयामधून ग्लोबल हॉस्पीटल येथे शस्त्रक्रियेकरिता संदर्भित करण्यात आलेले होते. ग्लोबल हॉस्पीटल हे पॅनलवर नसून श्री.चंदिरामाणी यांना बिर्ला हॉस्पीटलमार्फत संदर्भित करण्यात आल्याने ग्लोबल हॉस्पीटलचे शस्त्रक्रियेपोटी झालेले बिल अदा करण्यास हरकत नाही. तथापि, त्यानंतर ते ज्युपीटर हॉस्पीटल येथे उपचाराकरिता दाखल झालेले होते. श्री.चंदिरामाणी हे ज्यूपीटर हॉस्पीटल येथे स्वतःहून दाखल झालेले होते. ज्यूपीटर हॉस्पीटल हे पॅनवरील रुग्णालय नसून त्यांना ज्यूपीटर हॉस्पीटल येथे कोणत्याही पॅनलचे रुग्णालयामार्फत संदर्भित करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे ज्युपीटर हॉस्पीटलमार्फत सादर करण्यात आलेले बिल हे मंजूर करण्यात येवू नये.

१३. श्री.सय्यद, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता दि.२२/०९/२०१६ रोजी उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आलेले होते. तथापि, त्यांचेमार्फत दि.२७/१०/२०१६ रोजी महानगरपालिकेस कळविण्यात आलेले असून सदर कालावधी हा ११६ तासांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे श्री.सय्यद यांचे बिल मंजूर करता येणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ॲड.सर्जेराव लावंड<br>कायदा अधिकारी<br>(कायदा सल्लागार यांचे प्रतिनिधी) | डॉ.महेशकुमार डोईफोडे<br>सहा.आयुक्त,<br>तथा सदस्य | डॉ.मनोज देशमुख<br>वैद्यकीय अधिक्षक<br>तथा सदस्य |
| बबनराव झिंझुर्डे<br>अध्यक्ष, कर्मचारी महासंघ<br>तथा उपाध्यक्ष | राजेश लांडे<br>मुख्यलेखापाल<br>तथा सदस्य | पद्मश्री तळदेकर<br>मुख्यलेखापरिक्षक<br>तथा सदस्य |

डॉ. के अनिल रॉय
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
तथा कार्याध्यक्ष

दिनेश वाघमारे
आयुक्त
तथा अध्यक्ष

दि. ३०/९ १/९/१७